# महाराष्ट्र शासन

क्र.व्हीपीएम २०१५/प्र.क्र.४४/पंरा४
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई -४०० ००१.
दिनांक :- ०१ एप्रिल, २०१६

दुरध्वनी क्रमांक ०२२- २२०१७१०६
E mail - rddpr४@gmail.com

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सर्व.

विषय- ग्रामपंचायत हद्दीतील बीएसएनएलच्या मोबाईल टॉवरवरील कर आकारणी व वसुलीबाबत.

संदर्भ- १. शासनपत्र क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१३७/पंरा-४, दि. २३ जून, २०१५, दि. २७ जुलै, २०१५ व दि. ०२ नोव्हेंबर, २०१५
२. शासन अधिसूचना क्र. व्हीपीएम २६०९/प्र.क्र.१०६/पंरा-४(२२), दिनांक - २१ नोव्हेंबर, २०११
३. शासन अधिसूचना क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४(२२), दिनांक - ३१ डिसेंबर, २०१५

महोदय/महोदया,

संदर्भिय क्र. १ च्या शासनपत्रांन्वये राज्यातील बीएसएनएल टॉवर्सची माहिती संकलित करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार राज्यातील काही जिल्हा परिषदांमधील ग्रामपंचायतींनी त्यांच्या अधिनस्त बीएसएनएल मोबाईल टॉवर्सवर कर आकारणी व वसुली केल्याचे तसेच, काही जिल्हा परिषदांमधील ग्रामपंचायतींनी त्यांच्या अधिनस्त बीएसएनएल मोबाईल टॉवर्सवर कर आकारणी व वसुली न केल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम १२४ व याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० नुसार ग्रामपंचायतींना मालमत्ता कर व इतर अनुषंगिक कर आकारण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. संदर्भिय दिनांक २१ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसुचनेनुसार ग्रामपंचायत हद्दीतील पवनचक्की, दळणवळणाकरिता मनोरे आणि इतर प्रयोजनांकरिता वापरण्यात येणारे आणि त्यांची कार्ये पार पाडण्याकरिता आवश्यक असलेल्या खुल्या जागा यांवर कर आकारणीबाबतची पद्धती निश्चित करण्यात आली असून, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ च्या अधिसूचनेमध्ये याबाबत बदल करण्यात आलेला नाही. सदरील अधिनियम व नियमांमध्ये बीएसएनएल टॉवर्सना मालमत्ता करातून सवलत देण्यात आल्याची तरतूद नाही.

सबब, उक्त अधिनियम व नियमांतील तरतुदींनुसार राज्यातील बीएसएनएल टॉवर्सवर कर आकारणी व वसुली बंधनकारक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आपल्या अधिनस्त सर्व ग्रामपंचायतींना सूचित करण्यात यावे, ही विनंती.

आपला

०१/०४/२०१६

( संतोष कराड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- उपायुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग